१३ ऑक्टोबर २००८

# यान्त्रिक आरोग्य - वार्ता पत्र # 30

www.terapiahoma.com - www.homa1.com - www.homatherapy.info

प्रिंट वार्ता पत्र

संपादकिय वार्ता

होमा हिलींग

होमा थेरपि शालेय शिक्षणाचा अविभाज्य घटक

होमा सेंद्रिय शेती

पर्यावर्णिय वार्ता

कार्यक्रम

गुरूदेव श्री वसंत यांचा संदेश

ओरिअन ट्रान्समिशन कडून

## संपादकिय वार्ता

### उत्कृष्ट बचत "अग्निहोत्र'

आज, आपण संपूर्ण जगात निर्माण झालेल्या आर्थिक अडचणि पाहतो आहे आणि लोक त्यांच्या भविष्यातिल आर्थिक संकटाला घेऊन चिंता ग्रस्त आहेत. पैसा वापरण्याच्या सवयी वरून लोकांचे असे ग्रुप पाडता येतिल:

1) **कामगार वर्ग**: प्रार्थमिक गरजा भागवणे

2) **सर्वसामान्य वर्ग**: निरर्थक गरजा पूर्ण करणे

3) **अति कष्टाळू**: दुस-यांना मदत करणे

4) **कंजुष**: पैसा जपून ठेवणे

5) **बचति**: आपली मिळकत वाढवणे

तुम्ही कोणत्या ग्रुप मध्ये येतात? तुम्ही तुमच्या पैस्यांबरोबर काय करतात?

a) जवळ ठेवा
b) वाटा
c) विकत घ्या
d) बचत करा

सर्व साधारणपणे सगळयांना माहित असते की आर्थिक स्थिती चांगली असल्यास पैश्यांचा ओघ सगळी असतो. जर तो एकाच ठिकाणी किंवा गैरवापर झाल्यास आर्थिक स्थिती डळमळते.

म्हणून दुसरा प्रश्न असा येतो की एकदाका तुमच्या मुलभूत गरजा भागवल्या गेल्या नंतर, तुम्ही तुमच्या उर्वरित पैशांचे काय करता?

a) बैंकेत बचत करून ठेवतात

b) अधिक गोष्टी विकत घेता (कपडे, दागिणे, कार, घरे ई.)

c) अधिक आनंद साजरा करतात (दारू, सिगारेट, गोड पदार्थ, अन्न, सेक्स, पर्यटण ई.)

d) चारिटी मध्ये देतात

e) गुरू कार्यात मदत करा

f) अडकवा:

- बिझनेस जसे: फॅक्टरि, रिअल ईस्टेट, करमणूक, पर्यटण, ऊर्जा, अन्न, औषधि, शस्त्र, युध्द, ई.
- शिक्षण
- संशोधन
- शेति करण्यास योग्य जमिन
- पाण्याचा साठा




**PRACTICE THE FIVEFOLD PATH - FOR CLARITY AND HAPPINESS**

ह्या पैकी काही खूप चांगले आहेत. यापैकी एखाद्या ठिकाणी पैसा अडकवणे एखाद्यास सोईस्कर आहे काय?

अग्निहोत्रामुळे वातावरणाला आणि मनाला हिलींग मिळते. आणि, जेंव्हा आपण अग्निहोत्र (मुळ यज्ञ) करतो, तेंव्हा आपण एखाद्या निश्चित गोष्टीत अडकवत असतो. धर्माने अग्निहोत्र करायला सांगितलेच आहे ज्यामुळे आपण उत्कर्षाकडे जातो. तर्काने सांगायचे झाले तर चांगल्या गोष्टी केल्यामुळे निश्चितच चांगले होते. अग्निहोत्रामुळे आपण चांगले कामगार आणि ईनव्हेस्टर बनतो. पंच साधन मार्गात अग्निहोत्र ही मुळ क्रिया आहे पंचसाधन मार्ग आचरणात आणा (यज्ञ, दान, तप, कर्म आणि स्वाध्याय). हा शांति, प्रेम, शहानपण, आनंद, आणि उत्कर्षाकडे जाण्याचा मार्ग आहे.

लक्षात असू द्या अग्निहोत्र ही खूप लोकांसाठी अतिशय चांगली बचत आहे. त्यावर परिक्षण करा आणि सर्व शक्तिमान दयाळू देवाला ठरवू द्या आणि संभाळू द्या. ॐ ॐ ॐ.

**कृपया बघा: "श्री वसंत यांचे सूवर्णमय संदेश"**
http://www.youtube.com/watch?v=4qxlj35Fruo

**यान्त्रिक आरोग्या संदर्भात काही टिका,प्रश्न सल्ले, सहाय्य करावयाचे असल्यास कृपया डॉ.अबेल हर्नॅन डेझ आणि अलेता मकान यांच्याशि संपर्क** येथे साधा terapiahoma@yahoo.com
कृपया तुमच्या ईमेल मध्ये तुमच्या शहराचे, राज्याचे, आणि देशाचे नाव लिहा. हे आमच्यासाठी अधिक कार्यरत रहाण्यास मदत करेल. धन्यवाद!

www.terapiahoma.com - www.homa1.com - www.homatherapy.info

## होमा हिलींग अनुभव

**अझुसेना पेरेझ रॉड्रिग्युएझ, बोगोटा, कोलंबिया, दक्षिण अमेरिका**



अझुसेना पेरेझ तिचे पति मिगुएल एनजल लासप्रिला अग्निहोत्र करतांना

"मी ४६ वर्षांची आहे. पहिल्यांदा अग्निहोत्र केल्या नंतर जेंव्हा मी घरी परत येत होती, मला असे जाणवले की माझ्या डोळयातुन काहितरी चिकट पदार्थ निघाला. मी आरश्यात माझे डोळे पाहिले आणि मला आढळून आले की माझ्या डोळयातिल पांढरट भूर जी ठराविक वया नंतर येते ती गळून पडली. ही एक आश्चर्याची गोष्ट होती. ती प्रथम अग्नि-होत्रा नंतर झाली. फक्त थोडीच शिल्लक राहिली होती. आम्हाला हे अतिशय चमत्कारिक, खूप छान, आणि ईतके सुंदर वाटले की आम्ही ते प्रत्येक सूर्योदय आणि सूर्यास्ताला करायचे ठरवले. मी माझ्या नव-याला सांगत होती की "अग्निहोत्र भस्म घेत जा", कारण त्यांना हृनिटीस होता. काही दिवसां नंतर त्यांच्या लक्षात आले की त्यांना काहीच त्रास होत नाही ते स्वतःच भस्म निट घेऊ लागले. त्यांना हृनिटीस हा आजार २० वर्षांपासून होता आणि ३ आठवड्यांपेक्षा कमी कालावधितती बरा झाला. पूर्वी पेक्षा अधिक प्रेम घरात जानवत होते. मानसिकरित्या माझ्यात खूप बदल झाला. मी लहानपणा पासून खूप त्रास सहन केला होता. माझे वडिल दारूडे आणि स्त्रिलंपट होते. त्यांनि माझ्या आईला ६ मुलांबरोबर दुस-या स्त्रिसाठी सोडले.
हे जेंव्हा घडले, तेंव्हा माझ्या आईने आम्हा सर्वांना हे आयुष्य संपवण्यासाठी विष दिले, परंतु एक स्त्रि घरात आली आणि तिने आम्हाला वाचविले. आतासुध्दा माझी आई अतिशय खूप नर्व्हस आणि आमच्या आर्थिक परिस्थितीमुळे चिंतेत असते. म्हणून मानसिकरित्या माझे स्वाथ्य संतुलित नव्हते तरीसुध्दा मी काही मदतिस शोधत होते काही थेरपि आणि योगा मुध्दा. आता मला माझ्या हृदयात शांति आणि मनात प्रकाश जाणवतो आहे. हे सर्व अग्निहोत्रामुळे घडले आहे. कारण, माझे घर तेच आहे माझे पति तेच आहे, सर्व काही तेच आहे. मी आता खूप आनंदि आहे माझ्याकडे सर्व काही आहे. माझ्याकडे माझी प्रकृति, माझा नवरा, माझे घर, ई. आणि मी खूप आभारी आहे. हा क्षण आनंदाचा आहे. या आधि मी खूप डिप्रेस होते. होमा थेरपिमुळे माझे माझ्या नव-या बरोबर संबंध चांगले झालेत. आमच्या एकमेकांमध्ये प्रेम आणि जवळीक निर्माण झाली. आमच्यात जे मतभेद होते ते सर्व दूर झाले. आमचे संबंध खूप चांगले झालेत, माझे पति अधिक प्रेमळ आणि अधिक लक्ष देतात."



**एलिझाबेथ कॉरतेस**
**बोगोटा, कोलंबिया, दक्षिण अमेरिका**

"मी ५३ वर्षांची आहे. मी बोटॅनिकल गार्डन मध्ये एक्सपो हारमोनि फेस्टिव साजरा करायला गेले होते तेथे योगासहित, शाकाहार पर्यायि औषधांवर प्रेसेंटेशन आणि दुस-या काही खूप छान गोष्टी. मी ह्या सर्व गोष्टींचा भरपूर आनंद घेतलाह्य. परंतु माझे डोके सेल फोन वापरामुळे खूप दुखत होते मला खूप वेळ तेथेथांबायचे नव्हते. माझे वडिल देखिल सेल फोनच्या अति वापर मुळे डोक्यात कॅन्सर होऊन मेले. माझे डोके देखिल खूप दुखत होते. परंतु अग्निहोत्र केल्यानंतर डोकेदुखि जी गेली ती पुन्हा आलिच नाही.
मी मोबाईल घेऊन बोलू शकते तरी माझे डोके दुखत नाही. हे १५ दिवसांपूर्वी झाले तेंव्हा पासून माझे डोके दुखले नाही. होमा थेरपि खूप फायदेमंद आहे आणि मी अतिशय आभारि आहे. आता मी was अग्निहोत्र नियमितपणे करते कारण मला माहित आहे त्यामुळे माझे बरेचशे त्रास दूर होतिल."

# शाळेमध्ये अग्निहोत्र

## 'जोआक्विन डी लॉस अनडेस' शाळा, पॉंट मॉट, चिली

**शिक्षिका क्लाऊडिया फ्लोरेस यांनि शाळेत अग्निहोत्र सूरू केल्या नंतरचे परिणाम सांगितले:**

"पॉंट मॉट, चिली येथिल ही शाळा बही-या मुलांचि आहे. आमच्याकडे १८ मुले ही काही महिण्यां पासून ते १२ वर्षां पर्यंत आहेत. आम्ही येथे मदत करणा-या काही लोकांना धन्यवाद देऊ ईच्छितो. येथे आम्ही अग्निहोत्र २००६ मध्ये चालू केले आणि आज पर्यंत सूरू आहे.

मी होमा थेरपि शिकले आणि त्याच्या अगदि प्रेमात पडले. क्लाऊडिया, आमच्या शाळेचि डायरेक्टर हिने ते शाळच्या अभ्यास क्रमात घेण्याचे सांगितले. त्यात आम्हाला यश आले. आम्ही मुलांना आणि पालकांना होमा थेरपि काय आहे हे सांगितले. आम्ही त्यांना काही व्हिडीओज आणि शैक्षणिक चित्र दाखवले. आम्ही त्यांना अग्निहोत्राचे पात्र आणि इतर गोष्टी दाखवल्या. शाळेत मुलांबरोबर गोव-या तयार केल्या. आम्ही हे पाहून फार आनंदि झालो की अग्निहोत्रा नंतर जी ऊर्जा, प्रकाश, आणि विशिष्ट प्रकारचा सुगंध तयार होतो त्यामुळे मुलांच्या वागण्यात फार फरक पडला. मुले पहिल्यापेक्षा अतिशय शांत, आही झोपाळू त्यांचे लक्ष अग्निहोत्राकडे केंद्रित झाले होते. त्या आठवड्यात मुले अतिशय शांत आणि चूप होते, हे फक्त मुलां-साठीच नाही तर त्यात भाग घेणा-या मोठया लोकांना सुध्दा जाणवले.

त्या वर्षी आम्ही विज्ञान प्रदर्शनात भाग घेतला आणि तेथे आम्ही अग्निहोत्रा बद्दल सांगितले. मुलांनि तेथे आलेल्या दुस-या मुलांना आपल्या सांकेतिक भाषेत ते अग्निहोत्रा पासून काय शिकले ते सांगितले. आम्ही तेथे चित्रे, व्हिडीओज, आणि बाकी सामान दाखवले. आमच्या प्रदर्शनाला उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला की २ महिण्यांनंतर आम्हाला त्या भागातिल सर्व ठिकाणी प्रदर्शण करावयास सांगितले. आणि वर्षा अखेर **पर्यंत शाळेच्या डायरेक्टरांनि होमा थेरपि हा अविभाज्य घटक बनवला.**

ह्या वर्षा मध्ये आम्ही मुलांबरोबर आठवड्याला अग्निहोत्र करत होतो. आणि पालकांना अग्निहोत्र भस्मा अधिक वापराबाबत माहिती देत होतो. **नंतर आम्ही पुन्हा विज्ञान प्रदर्शनात "होमा औषधि" ह्या विषयावर भाग घेतला. लोकांनि अग्निहोत्रात भाग घेतला. आम्ही भस्म घेऊन औषधि तयार करून ते दुस-या शाळेतिल मुलांबरोबर वाटले.** अम्ही शाळेच्या फर्स्ट एड बॉक्स मध्ये देखिल अग्निहोत्र भस्माची औषधि ठेवली आहे, जी आपण कुठल्याहि प्रसंगि वापरू शकतो. अग्निहोत्र सूरू केल्यानंतर आणि भस्म आषधि वापरल्यानंतर मला असे आढळू आले की हे सर्वांसाठीच खूप उपयोगाचे आहे. **सगळयांनिच ते करून पहायला पाहिजे आणि सर्वांबरोबर वाटायला पाहिजे.** मुलांमध्ये आणि मोठयामध्ये वाटण्याचि ही छान संधि आहे. ह्यामुळे शिक्षणंत सर्वांना उत्साह आपल्याला काहितरी वेगळे करायचे आहे आणि आपण कस प्रेम करू शकतो आणि ह्या ग्रहाची काळजी सोप्या आणि परिणामकारक पध्दतिने कशी घेऊ शकतो ते शिकायला मिळते. सौ. हिलडा, शाळेचि मॅनेजर: "आम्ही शाळेत होमा थेरपि २ वर्षां पासून करतो आहे. आम्हाला दिसून आले की क्रिस्टल अतिशय चांगला प्रतिसाद देते आहे. डॉक्टरांच्या सांगण्याप्रमाने तिला श्वसनाचा त्रास होता आणि तिला धुर आणि धुळीत जाऊ द्यायचे नव्हते. परंतु आता तिला त्रास नाहि ती व्यवस्थित श्वास घेऊ शकते. ती आता सर्व गोष्टीं मध्ये भाग घेते. **होमा थेरपि म्हणजे सकारात्मक ऊर्जेत आंघोळ केल्यासारखे आहे.** आमच्यासाठी होमा थेरपि ईतकी ओळखिची झाली आहे की आम्ही मंत्र घरी देखिल म्हणतो."



आम्हाला ह्या भागात वैज्ञानिक प्रर्दशनात भाग घेण्या-साठी आमंत्रीत केले गेले तेथे आम्ही "होमा औषधि" करुन दाखवले **जेथे लोकांनि अग्निहोत्र अनुभवले, भस्म घेतले, काहि औषधि तयार केल्या आणि दुस-या शाळेतिल मुलांबरोबर वाटले.**



आम्ही शाळांमधिल विज्ञान प्रर्दशनात भाग घेतला जेथे आम्ही अग्निहोत्र करुन दाखवले. **मुलांनि सांकेतिक भाषेत दुस-या मुलांना ते अग्निहोत्रापासून काय शिकले ते दाखवले.** आम्ही तेथे चित्र, व्हिडी-ओज, शालेय साहित्य दाखवले.

## होमा सेंद्रिय शेति - ह्या ग्रहाच्या उज्वल भविष्यासाठी एक उपाय!

### होमा वातावरण - A CLIMATE ENGINEERING EXPERIENCE

होमा शेतकरी अभय मुतालिक देसाई सुट्टागट्टी, बेळगाव, कर्नाटक, भारत

"श्री. ओ.पी. रुपेला, आंध्रप्रदेशहून मायक्रो बायालॉजीचे शास्त्रज्ञ यांनि २३ ऑगस्ट रोजी आमच्या जैविक होमा शेताला ह्या वर्षी भेट दिली त्यांनि त्याबद्दल खालिल उद्गार काढले:
'ह्या होमा शेतातिल पिकाचे उत्पन्न संपूर्णपणे संतुलित आहे, हे फक्त जेंव्हा निर्सग हा पुर्णपणे संतुलित आणि तालात असतो तेंव्हाच होते. हे शेतकीय संशोधन करणा-या शास्त्रज्ञांसाठी शिकण्यासाठी एक चांगले ठीकाण आहे....'

ह्या वर्षी २००८ मध्ये भारतात खूपच कमी अधिक प्रमाणात पाऊस झाला त्यामुळे उत्पन्न अतिशय कमी झाले. मार्च हा अतिशय गरम आणि कोरडा महिना असतो. परंतु नद्या आणि नाले हे भरुन वाहत होते आणि गहू उत्तर कर्नाटक मध्ये कापणिसाठी तयार होता, तांदुळ केरळमध्ये आणि दाळी कर्नाटकाच्या समुद्र किणा-यालगत नष्ट झाल्या.



गव्हा बरोबर घेतलतला ऊस.

मी गेल्या ५० वर्षात भारतात कधिच मार्च महिण्यात पाऊस पाहिला नाहि. **आश्चर्याचि गोष्ट म्हणजे मी माझे ४ एकर मधिल गहू जे मी ऊसा बरोबर लावले होते, त्याच्या कापणि नंतर हा पाऊस झाला.** आणि ह्या पावसामुळे माझ्या कॉफी, मिरी, ऊस आणि एक महिण्याच्या उन्हाळी भुईमूगाला फार फायदा झाला. नंतर एप्रिल पासून २० मे पर्यंत दिवस अतिशय कोरडे होते. धारवाडहून चार शेतकी शाळेचे विद्यार्थि जैविक होमा शेतिचे तत्व शिकण्यासाठी आले. त्यांच्यापैकी तिनजनांणा होमामुळे होणा-या बदलावर विश्वास नव्हता, त्यांना वाटत होते की फक्त जैविक पद्धति पुरेशि आहे.

मी त्यांना अगोदर २०००, २००३ आणि २००४ मध्ये घडलेली पाऊस फक्त माझ्या शेतात आणि गावातच पडला. १३मे रोजी आम्ही सगळे शेतात काम करत होतो आणि तेथे कोटेही अजिबात ढग नव्हते. बरोबर दुपारी २.०० वा. आमच्या शेतावर ढक छोटा ढग निर्माण झाला, बाकी सर्व आकाश स्वच्छ निळे होते. थोड्याच वेळात ढगांचा आवाज झाला आणि पाऊस पडायला लागला आणि डगांच्यामागे अगदि स्वच्छ सूर्य प्रकाश होता. अशाप्रकारे कमित कमी २० मि. पाऊस झाला मी, ते विद्यार्थी आणि सर्व कामगार हा प्रकार आश्चर्याने पाहत होतो.

पावसाळा लवकर म्हणजे २० मे रोजी सुरु झाला. मी ५ एकर मध्ये उन्हाळी भुईमूग फेब्रुवारी अखेरिस पेरला होता. उशिरा पेरल्यामुळे मी कापणी जूनच्या पहिल्या आठवड्यात केली मला कापलेला भुईमूग सुकण्यासाठी सूर्य प्रकाश हवा होता. हवामान खात्याने लवकर पावसाळा सांगितला होता. पाऊस २८ मे पर्यंत पडला आणि बंद झाला, आणि स्वच्छ ऊन पडल त्यामुळे माझा भुईमूग वाळला आणि मी ३एकर मध्ये तांदूळ पेरला पुढे पाऊस १६ जून पर्यंत पडला. मी पुन्हा १ एकर मध्ये भुईमूग लावला आणि पुन्हा पाऊस पडला.

पावसाळयात नेहमीच कामगारांची कमतरता असते. मला १४ ऊस, ३एकर तांदूळ आणि १ एकर भुईमूगा तिल गवत काढायचे होते त्यासाठी पाऊस थांबणे गरजेचे होते. तुम्ही विश्वास ठेवणार नाही पण २४ जून ते ४ ऑगस्ट पर्यंत माझ्या शेतात अतिशय कोरडे होते त्यामुळे मला गवत काढणे शक्य झाले. परंतु Bउत्तर कर्नाटकातिल ज्या शेतक-यांनि मे मध्ये पेरले होते त्यांची सर्व पिके वाया गेली. मला कुठल्याही प्रकारचा त्रास झाला नाही. आणि म्हणूनच मी २० जुलै पासून त्र्यंबकं करण्याच्या वेळेत वाढ केली. ४ ऑगस्ट पासून पुन्हा जोरात पावसाला सुरुवात झाली. येथिल घाटप्रभा नदिला पुर येवून हिडकल डॅम एका आठवड्यातच पूर्णपणे भरला. त्यामुळे पुराचे पाणि आमच्या एक एकर तादुळाच्या शेतात घुसले, कृष्णा कुमुद नावाचा तांदुळ पूर्ण पाण्याखाली गेला. (फोटो डाविकडे)



**(उर्वरित पेज ५ वर)**

मला असे वाटले की लोप पावणारि काळा सुगंधित तांदूळाचा प्रकार आता हातातुन जाणार. ऑगस्टच्या तिस-या आठवड्यात डॅम मधिल पाणि कमी झाले आणि आमचा काळा तांदुळ वाचला. आता सगळा तांदुळपाण्या बाहेर आहे आणि आम्ही चांगल्या पिकाची अपेक्षा करतो आहे. (फोटो खाली)
**म्हणून, सपूर्ण जगात होणा-या वातावरणातिल खूप मोठया बदलामध्ये देखिल आम्ही होमा थेरपिचा अवलंब करुन आम्ही यशस्वी झाला आणि जगलो.** मला असाच अनुभव मागे देखिल आला आहे, मला जेव्हा पावसाची गरज होति तेंव्हा पाऊस पडला, आजुबाजूला कोरडे असायचे.



आणि आजुबाजूला जेंव्हा जोरात पाऊस पडून पिकांना नुकसान व्हायचे तेंव्हा माझ्या पाऊस नसायचा त्यामुळे नुकसान टळायचे. आजचा ११ सप्टेंबर २००८चा पेपरातिल ठळक बातमी वाचली: "कर्नाटकातिल बिदार जिल्ह्यात जोरदार पाऊस पडून लाखो रुपयांच्या डाळींचे नुकसान झाले." "निंबाच्या झाडाला फुले आताच यायला लागले ते एप्रिल हिण्यात येतात."(हवामानाचा भरवसा राहिलेला नाही.)
**आम्ही आभारी आहोत कारण आमच्या जिवणात होम आहे."**

## जैविक (पर्यावरणिय) वार्ता

**प्लासटिक बॅग**
युनुटेड स्टेट येथिल पर्यावरण संरक्षण समितीने सांगितल्या नुसार आपण आतापर्यंत जवळपास ५०० कोटीप्लॅसटिक बॅग जगात सर्वत्र प्रत्येक वर्षी कचरा म्हणून फेकुन दिल्या जातात. १टक्क्यंपेक्षा कमी प्लॅसटिक बॅग पुन्हा प्रक्रिया करुन वापरात आणल्या जातात. **आणि नवि बॅग तयार करणे प्रक्रिया करुन बॅग तयार करण्यापेक्षा अधिक महाग आहे.** एक टन बॅग प्रक्रिया करुण्यावर जवळपास ४००० डॉलर खर्च होतात तरबाजारात त्याला ३२.०० डॉलरला विकल्या जातात असे सॅन फॅनसिसको येथ पर्यावरण संरक्षणे समितीचे डायरेक्टर जारेड ब्ल्युमेनफेड म्हणाले.
बांगला देशाने प्लॅसटिक बॅगवर बंदि आणली, चिनने प्लॅसटिक बॅगवर बहिष्कार टाकला. युरोप मध्येआयरलॅंडने सर्व प्रथम प्लॅसटिक बॅग वापरावर २००२ मध्ये टॅक्स लावला. म्हणून त्याच्या वापर ९० टक्केकमी झाला. २००५ मध्ये रवांडाने प्लॅसटिक बॅगवर बहिष्कार टाकला. ईसराईल, कॅनडा, पश्चिम भारत, बोस्टवाना, केनिया, टंझानिया, दक्षिण अफ्रिका, तैवाण, आभि सिंगापुर, यांनि देखिल बहिष्कार टाकला किंवा ते टाकायच्या मार्गावर आहेत. मार्च २७, २००७ रोजी सर्व प्रथम सॅन फ्रॅनसिसकोने बहिष्कार टाकला ओकालॅन्ड आणि बोसटन त्या मार्गावर आहेत. **प्लॅसटिक बॅग ह्या पॉलिथीन पासून बनतात:** हे थरमोप्लॅस्टिक पेट्रोलियम पासून तयार केले जाते, ज्यामुळे अनेक व्याधि निर्माण होतात....






**हजारो प्राण्यांचा मृत्यु** जसे पक्षी, कासवे, समुद्रि सिंह आणि मासे प्लॅसटिक बॅग खाल्यामुळे मेले. त्यांना ते त्यांचे अन्न वाटते (ग्रिनपीसने सांगितले की १८०००प्लॅसटिक बॅगचे तुकडे समुद्रा प्रत्येक किलोमीटरला तरंगत असतात.)
**प्लॅसटिक बॅग कुजण्यासाठी लागणारा कालावधि:** प्लॅसटिक बॅग कुजण्यासाठी खूप मोठा कालावधि लागतो. (जवळपास १०० ते ४०० वर्षे) जेंव्हा त्याच्यावर रासायनिक क्रिया केली जाते, केंव्हा केंव्हा ते कुजतच नाहि.
**¡¡प्लॅसटिक बॅगला "नाही" म्हणा!!**काहि प्लॅसटिक बॅगमध्ये विषारी रासायनिके असल्यामुळे वाढत्या कर्क रोगाचा धोका निर्माण झाला आहे. **¡¡ प्लॅसटिक बॅगला "नाही" म्हणा!! - कापडी पिशवी वापरा.**

**एनव्हायरामेंटल न्युज नेटवर्क(ENN):**
**From:** ट्रिपल पुंडित, ऑक्टोबर ११,२००८ **09:12 AM**



**जंगल तोडिमुळे निर्माण होणारी समस्याही आता असणा-या आर्थिक समस्येपेक्षा देखिल गंभिर आहे. जंगल तोडिमुळे आपला जास्त पैसा आता असणा-या आर्थिक समस्येपेक्षा अधिक वाया जातो.**
ह्या मागचे कारण अगदि स्वच्छ आहे जेंव्हा आपण नैसर्गिक संपत्तीची कींमत काढतो- आपल्याला निसर्गापासून क्षार, पाणि, हवा, सूर्य प्रकाश, ऊर्जा, झाडे, प्राणि, आणि इतर जैविक वस्तु मिळतात. ज्याप्रमाने जंगलतोड आणि इतर नैसर्गिक संपत्ती तोडली जाते आहे त्याने खूप पर्यावरणिय शास्त्रज्ञांना चिंतेत टाकलेआहे. परंतु हा एकमेव रस्ता आहे ज्यामुळे सरकार, मोठे उद्योग, आणि मोठया प्रमाणात समाज त्या कडे लक्षदेतिल. बीबीसीने दाखविलेल्या माहिती नुसार डच बॅंकेच्या सर्थ तज्ञांनि सांगितले: ....वेगवेगळया परिक्षणां-तर्गत असे दिसून आले की ह्या सर्व गोष्टींमुळे आर्थिक अस्थैर्यहे वर्षाला जवळपास १ ते १.५ कोटी डॉलर इतके आहे, परंतु आजच्या तारखेला आपण नैसर्गिक संपत्तीही वर्षाला २ ते ५ कोटी डॉलर इतकी आहे. लक्षात असू द्य वार्षिक किंमत.....आणि ती फक्त जंगलांवर. काही उद्योगांसाठी मोठ मोठी जंगले जाळणेकिंवा तोडण्याने थोड्या फायद्यासाठी खूप मोठे नुकसान आपण करीत आहोत. **ही गोष्ट करुन तुम्हाला जो काही फायदा होतो तो फायदा तुम्हाला या गोष्टी पासून मिळणा-या स्वच्छ हवा आणि पाणि, प्रदुशन,व्यवस्थित हवामान, मातीला नवचैतन्य प्राप्ती, ओझोन प्रोटेक्शन, सावली आणि निवारा, ई. - ह्या सर्व गोष्टींवर खूप पैसा घालवावा लागतो.** तुम्हाला हे वाचून अधिक निराश व्हायचे असेल तर तुम्ही स्टेर्ण रिव्ह्युव वाचा ज्यात लिहीले (टिका केल्याशिवाय नाही)तुम्हला बदललेल्या हवामानावर अधिक माहिती काढायची असेल तर. चांगली वार्ता: ह्या सारख्या मोजमापणामुळे आता अर्थ शास्त्रज्ञ, सरकार, आणि उद्योगधंदे ह्याhatगोष्टी एकायला लागले आहेत. पूर्वी जंगल तोडीवर केस करण्यासाठी महत्वाची कागदपत्रे नव्हती कींवा पर्यावरणाविषयी कायदा भक्कम नव्हता.

## कार्यक्रम

## बोटॅनिकल गार्डन, बोगोटा, कोलंबिया






**रविवार २१ सप्टेंबर रोजि अग्निहोत्र एक्सपो हारमोनि फेस्टिवलचा भाग होते** हा नविन युगाचा मेळावा ज्यात परपुर लोक आली होति तो टिव्ही स्टारने आयोजित केला होता, झिओमि आणि विदा सानाचे संस्थापक. हा उत्सव संगित गाणे, नाच, आणि शाकाहार आणि भरपुर गोष्टी ज्या निरोगी आयुष्य कसे food जगायचे ते सांगितले गेले. अग्निहोत्र हे ह्या कार्यक्रमाचा शिरोमनी झाले ज्यामुळे ऐक्य, ऊब आणि प्रेमाची भावना सर्वांमध्ये निर्माण झाली.

खरोखरच अग्निहोत्राला जर आपण आपल्या जिवनाचा केंद्र बिंदु मानले तर सर्व काही गोष्टी शांतित परिवर्तीत होतात खुप मेनती विना करुन पहा!



**रविवार, २८ सप्टेंबर होमा थेरपि प्रेझेंटेशन - "बोगोटासाठी शांति"**

मॅलोका या बोटॅनिकल गार्डन मध्ये होमा थेरपि शिकण्यासाठी जवळपास ३०० लोकं जमलि होती. ज्यामध्ये व्हिडीओ दाखवले जाणार होते आणि सर्वांनि सायंकाळच्या अग्निहोत्राची ऊर्जा शक्ति अनुभवली तेथे तेंव्हा कमिकमी २० अग्निहोत्र पात्र पेटवली गेली ज्यामुळे शांत आणि पेममय वातावरण निर्माण झाले. सर्व लोकांना एका पाकिटात अग्निहोत्र भस्म दिले गेले ज्यावर अधिक माहिती करिता फोन नंबर दिलेला होता. खूप लोक फोन करुन राहिले आहेत. आता सगळीकडे ऊर्जा प्राप्त करण्यासाठी अग्निहोत्राची फार गरज आहे. मॅलोका हा मिटींग हॉल मुयस्का या जातिने विश्ष्टि भौगोलिक परिस्थिती पाहुन तयार केला आहे. ते बाकाटाचे पूर्वज आहेत (बोगोटाचे खरे नाव अर्थ हि-यांची नदी). **ते ऊर्जात्मक पणे बोगोटाचे हृदय आहे.** ह्या मिटींग मध्ये उपस्थित सर्वांना आर्शिवाद प्राप्त आहेत. मोठया प्रमाणात सामुहिक अग्निहोत्र ह्या ऊर्जात्मक ठिकाणी दर रविवारी घेतले जाते. आम्ही श्री. सौगागुआ, श्री. हरमन मार्टिनेझ गोमेझ, डॉ. जोस ॲन्टोनिओ मागमुद, डॉ. ओरलॅन्डो गोमेझ, श्री. मिचेल मोलीना, श्री. जेमि वालब्युना आणि सर्व मदतनीस ज्यांच्या मुळे हा हिलींग कार्यक्रम शक्य झाला आणि ज्यांचा नेहमि पाठिंबा आहे.

## कार्यक्रम - कोलंबिया






डॉ. ओरलॅन्डो गोमेझ आणि त्यांच्या पत्नि जुलिया ईम्मा गारझोन यांच्या घरी नियमित सामुहिक अग्निहोत्र होत असते. खुप लोक ब-याच वर्षां पासून नियमित अग्निहोत्र करत आहेत आणि त्यांच्याकडे सांगण्यासाठी खुप चमत्कारिक गोष्टी आहेत. प्रकाशाचे कुटूंब दिवसें दिवस वाढत आहे...




मुयस्का जातिचे प्रमुख, श्री. सौगागुआ आणि त्यांची पत्नि तिमी आणि इतर लोक जे अग्निहोत्राचे ट्रेनिंग घेण्यासाठी एकत्र जमले होते. श्री. सौगागुआ यांना अग्निहोत्रा नंतर लगेच बधुत्वाची आणि स्विकार करण्याची भावना निर्माण झाली.

## कार्यक्रम - ईबागुयी, तोलीमा, कोलंबिया

डोरा लूझ, डॉ. मारको ओरेलिओ कॅबेझास आणि त्यांचि पत्नि एसपरांझा पारेडेस यांनि आम्हाला इबाक्वि येथे डिपार्टमेंट ऑफ टोलिमा येथे होमा थेरपि शिकवीण्यसाठी बोलावले. त्यांची सायकोलॉजिस्ट मुलगी लिंडा कॅबेझास रेडिओ आणि टिव्ही ईंटरव्हु आणि शाळेतिल शिक्षकांना बोलावले होते.(फोटो खाली उजविकडे). त्या कुटूंबा बरोबर छान अग्निहोत्र मिटीग झाली (फोटो उजविकडे) आणि मित्र (फोटो खाली), ज्यांनि हा साधा आणि शक्तिशाली हिलींग फायर सूरू केला.









तोलिमा येथिल विद्यापिठात जे व्हिडीओज मानवी आरोग्य आणि शेति आणि होमा थेरपि बद्दल एक प्रकारचि उत्सुकता निर्माण झाली. सायंकाळच्या अग्निहोत्रानातर एका बाईला हात दुखिपासुन आराम मिळाला जो तिला खूप आठवडयां पासुन होता.



काही लोकांचा जमाव फूड्स या हॅटेलात जमला होतो प्लाझा बोलिव्हार येथे (ईबाक्वि येथिल मध्यवर्ति ठीकाण)शक्तिशाली होमा थेरपि आणि अग्निहोत्र शिकण्या साठी ईबाक्विच्या ईको न्युज मध्ये होमा बद्दल माहीती आली. (फोटो खाली).



## जर्मनि



**राजा फिसचेर, वेन्डलॅन्ड जर्मनि:**
अग्निहोत्राच्या वेळेस तभगशेल यांच्या डिमीटर या शेतात होमा थेरपि बद्दल माहीती सांगितली. जवळ पास ५० लोकांनि या कार्यक्रमात सहभाग घेतला त्यांच्यात खूप उत्सुकता होति. आणि त्यातिल काही लोक आता अग्निहोत्र परिवाराचा हिस्सा बनले आहेत



येथे तुम्ही अग्निहोत्र टिप्पी पाहू शकता ती आमच्या युनिकॉर्न नॅचरल व्हॉईस ॲन्ड डान्स कॅम्प ह्या वर्षी जुलै मध्ये (वेन्डलॅन्ड, उत्तर जर्मनि). आम्ही जवळ पास १४० मोठे आणि ६० मुले ह्या कॅम्पला होतो. रोज नाच गाणे होत अग्निहोत्रामुळे येथे एक प्रकारचे प्रेममय वातावरण निर्माण झाले होते.

## थायलॅन्ड

**रॉब बॅगनाल, चिॲग माई, थायलॅन्ड**
३ महिण्यांच्या परिक्षणानंतर मला आढळून आले की आमच्या घरा शेजारी मासे आणि गोगलगायी पुन्हा येउ लागल्या. मी घराच्या मागे आज सकाळी गेलो आणि पाण्यात पाहिले तर तेथे सगळीकडे गोगलगायी होत्या. मासे सुध्दा परत आले आणि शेजारिल कोंब-ड्या माझ्या आंगणात येतात गांडूळे देखिल मोठया संख्येने आलीत. ह्या चित्रात दाखविलेली नारळे सुध्दा नियमित खूप यायला लागली. **घराच्या मागे असले-ल्या बागेतिल झाडे झुडूपांमध्ये देखिल फरक दिसाय ला लागला आहे. झाडांची पाने तपकिरी होण्याची थांबली आणि छान चमकदार हिरवी दिसू लागल.** मला एक फरक असा आढळून आला की ते अधिक चांगल्या प्रकारे वाढू लागली. मला याला जिनीअस ईफेक्ट म्हणायला आवडेल'.

**मला असे आढळ आले की खूप प्रकारचे किडे, पक्षी मासे, सूक्ष्म जिव ई. पुन्हा तयार झालेत. खूप कमी वेळा मध्ये. हे काहीतरी अति विशेष आहे.**



वरिल फोटो:
जुन्या फांद्यांवर ३ते४ फळे आणि नविन फांद्यांवर कमितकमी २० फळे तयार होत आहेत जेंव्हा पासून होमा थेरपि सूरू केली.



डाविकडे फोटो:
डॉ. स्विवेक, रॉर्बट बॅगनाल आणि ॲन गॉडफ्रे मागिल बागेत अग्निहोत्र करित असतांना.

## भारत

### होमा सेंद्रिय शेति प्रशिक्षण वर्ग, तपोवन, जळगाव, महाराष्ट्र, भारत



पहिला होमा सेंद्रिय शेति प्रशिक्षण वर्ग तपोवनला जुलै २००८ महिण्यात झाला. ह्या ३ दिवसांच्या प्रशिक्षण वर्गात जवळपास २० शेतरी आणि कामगारांनि भाग घेतला. यात भाग घेणारे जळगाव जिल्ह्यातिल आणि केळींचे उत्पादन घेणारे शेतकरी होते.



परंतु येथे मुंबई, कर्नाटक, आणि उत्तरांचलहून देखिल काही लोक आली होति. प्रशिक्षण वर्ग पंच साधन मार्गाच्या लोकांनि प्रस्तुत केला. हा कोर्स ब्रुस जॉनसन आणि संजय पाटील तपोवनचे मॅनेजर यांनि ३ भाषेत - इंग्लिश, हिंन्दी, आणि मराठीमध्ये घेतला. ऋशिकेष परांजपे, दिलीप पाटील, आणि संजय रोमन यांनि भाषांतर केले. यात घेतलेले विषय:



- सध्याचि शेतितील परिस्थिती
- होमा सेंद्रिय शेती - कायमस्वरुपि हरितक्रांति
- शेतिमध्ये होमा थेरपिचा वापर
- गांढूळ खत आणि ग्लोरिया बायोसोल
- अग्निहोत्र आणि ॐ त्रंबकं होम
- रेसोन्स पॉइंट
- शेतक-यांचा मित्र- गाय, गांढूळ आणि मध माशी
- नेसर्गिक किटक नियंत्रण
- होमा शेतिचे परिणाम आणि व्हिडीओज दाखवले.



होमा सेंद्रिय शेती प्रशिक्षण वर्ग सुरु आहेत. अधिक माहिती साठी कृपया येथे पहा: www.tapovan.net

## चिली

**ईको-होमा शेती ओलम्प्यु, चिली**

कार्यक्रमात भाग घेण्यासाठी आमंत्रण देत आहे:

**होमा सेंद्रिय बगिचा**

**रविवार, 19th ऑक्टोबर 2008**

**बगिचा + होमा थेरपि= आरोग्य.**

बगिचेचा अर्थच आरोग्य असा होतो. जर आपण होमा थेरपिचा अवलंब केला तर त्याचे परिणाम हे स्थूल शरीरा पलीकडे होतात. होमा फार्म जगात सर्वत्र आहेत त्यापैकी एक ओलम्प्यु आहे. सेंद्रिय होमा बगिचेमुळे अगदि थोड्या खर्चात चांगले उत्पादण मिळते. आता अशा प्रकारचा बगिचा तयार करण्याचि वेळ आली आहे. होमा बगिचेमुळे पर्यावर-णाचा समतोल राखला जातो त्यामुळे आरोग्य लाभते.

जर तुम्ही यात भाग घेण्यासाठी उत्सुक असाल तर कृपया श्री. जॉर्ज सोटो यांच्याकडे नाव नोंदवा : tel. 9 815 5242 किंवा श्री. लुईस व्हॅलेनझुएला: tel. 9 250 2816. हा कोर्स आत्ताच सुरु झाला आहे.

## गुरूदेव श्री वसंत यांचा संदेश

सर्वसाधारण माणसामध्ये ज्या गोष्टी आपल्याला आनंद देतात त्या गोष्टींबद्दल आकर्षण आपोआपच येते. एखादि संधि आनाद मिळविण्यासाठी मनाची तयारी पटकन होते आणि आपोआपच मनुष्य त्या गोष्टी मध्ये जास्त वेळ राहण्याचे मार्ग शोधू लागतो.

जर तुमच्या जिवणाचे ध्येय परमेश्वर असेल तर मदय, मुक्ति, फक्त माझीच नाही तर तुमची देखिल होईल त्यासाठी तुम्हाला मनाच्या तावडीतुन सुटण्यासाठी काही विशीष्ट प्रयत्न करावे लागतिल आणि स्वतःला विशीष्ट सवयीं मध्ये लागेल. ज्ञानेंद्रियांच्या आनंदामध्ये खूश होण्यापेक्षा तुम्ही त्या परमेश्वराची ईच्छापूर्ण करण्याचे चांगले साधण कसे व्हाल याचा विचार करायला हवा. तुम्हाला सतत जागरुक राहून ह्या दृष्टीने प्रयत्न करायला हवे. ही तुमच्या जिवनातील महत्वाची क्रिया आहे. जेंव्हा तुम्हाला ही गोष्ट करतांना यश मिळेल तेंव्हा तुम्हाला जिवनातील खरा आनाद काय आहे याची जानिव होईल. आणि आपोआपच तुम्ही अपेक्षा विरहीत चांगले कर्म करण्यात स्वतःला गुतवून घ्याल आणि येथे आर्शिवाद काम करायला लागेल.

सदगुरुंनि त्यांचा आर्शिवा देण्यासाठी प्रथम तुम्हाला तुमचे भांडे रिकामे करावे लागेल. याचा अर्थ असा की तुमचा सगळा स्वार्थीपणा जायला हवा. हे घडून येण्यासाठी अग्निहोत्र आणि दान, आनंदि जिवनाच्या दोन भौतिक गोष्टी करायला हव्यात. मदतिसाठी मंत्रजाप करा.



मंत्रोच्चारण सतत संपूर्ण लक्ष त्याच्या ऊर्जात्मक अर्थाकडे देऊन करायला हवे. यामुळे ऊर्जा चक्रा टिकून राहते.

यज्ञामुळे तुमच्या सध्यस्थिती पेक्षा जागरुकस्थितीत अधिक सूक्ष्मतेकडे जाण्यास मदत मिळते. ही अशी जागा आहे जेथे परमेश्वर आपल्याकडे येतो आणि आर्शिवाद देतो. सतस स्वतःला निशुध्दिकरण हेतु चांगले कर्म करत रहा आणि अपोआप तुम्ही परमेश्राच्या आर्शिवादाला प्राप्त व्हाल.

तुम्हाला कदाचित एकटे किंवा शुष्क वाटत असेल. तरीपण तुम्ही केलेला प्रत्येक विचार त्या परमेश्वराला माहित आहे. जर तुमची प्रार्थना गरजेची आणि तुम्ही अधिक आणि अधिक निर्मळ, तुमचे ध्येय परमेश्वर प्राप्तिसाठी दुस-यांना मदत करण्यासाठी असेल तर तुमच्या भूतकालीन कर्मांचा बोजा कमी होईल. पंच साधन मार्गाचे आचरण म्हणजे यज्ञ, दान, तप, कर्म, आणि स्वाध्यायाचे आचरण करा. तुम्ही जन्म मरणाच्या चक्रातुन सुटाल आणि स्वर्गाच्या मार्गावर चालण्यास तयाल व्हाल जे आपल्यातच आहे.

## ओरिअन ट्रान्समिशन कडून

**(पार्वती बिझबर्ग, पोलंड यांना मिळालेला संदेश)**

**जातिंवर**

होय, होय. ही जमात सगळयात सर्जनशील आहे, तरी हे देखिल एक कुटूबाचा प्रकार आहे. जमातींच्या महत्वाच्या मुदयावर लक्ष देऊ..जातींची निर्मीती तेंव्हा झाली जेंव्हा काही लोक एकाच उद्देशाने, जसे कुटूंब, एकाच प्रकारची अध्यात्मिक आसक्ति आणि समान मुलभूत गरजा. तरीसूध्दा जाति ह्या किमान व्याख्येच्या पलिकडे गेली. निसर्गात देखिल जाति सर्वप्रथम आहेत. एखादया अज्ञात शक्तिने माणसांना निर्माण करण्यासाठी एकत्र आणले जाते. तेथे नेहमि निशब्द संपर्क चालू असतो, शब्दांच्या आणि व्याख्येच्या पलिकडे, नियम आणि मार्गदर्शनाच्या पलिकडे त्याचे स्वरुप नंतर संेद्रिय होते. तेथे देखिल एक जन्मजात ओळख असते जेंव्हा तुम्ही तुमच्या जातिच्या लोकांमध्ये जातात. जात ही जगात कुठेही जाऊ शकते, परंतु मानसातिल सारखेपणा एकाचवेळी जगात एकाच ठिकाणी असू शकतो. अग्निहोत्रातिल अग्नि हा एका जाति कडून दुसरिकडे जाऊ शकतो त्याला कोणिही फक्त स्वतःपुरते सांगु शकत नाही. अग्निहोत्र हे एकमेव साधन आहे शरिर, मन, आत्मा आणि वातावरणाला पुनरुतजिवीत करण्याचे....
एकदाका जातिंमध्ये कोणी एक जिवणातिल प्रत्येक गोष्टी तुन, प्रत्येक शर्यतितुन, धर्म, आणि संप्रदायाचे लोक असू शकता. ह्याच कारणामुळे मानव एका देशातुन दुस-या देशात स्थलांतर करित आहे आणि अरत राहणार आहे. एखाद्याचे जन्म ठीकाण हे त्याला त्या ठीकाणी बांधून ठेऊ शकत नाही. परंतु एखाद्या ठीकाणाहून आपल्या शेवटच्या ठीकाणी स्थलांतर करणे ज्यामुळे तो किंवा ति स्वतःला जगाच्या एका बाजुला संपूर्णपणे दुस-या रिवाजामध्ये असून सुध्दा घरी असल्याचा भास होतो. जो स्वतःच्या देशात देखिल होत नाही. आता दिवसेंदिवस जागतिक कुटूंब हे मोठे होत आहे स्वतःच्या पूर्वजांपेक्षा देखिल. ...

**आध्यात्मिक मार्गावर**

... जेंव्हा एखादा या मार्गावर येण्याचे धाडस करतो तेंव्हा त्याला 'अध्यात्म' म्हणतात त्याचे किंवं तिचे सुरुवातिचे कारण काहिही असू शकते जसे स्वतःची सेवा- चांगले जिवण जग-ण्यासाठी आतिल शांति, चूप राहणे उत्तण जिवणाचा एक मार्ग. जर एखाद्याला जर खरच अध्यात्मिक मार्गाकडे जायचे असेल आणि सुरुवातिच्या काळात त्याचा समतोल राहिला तर त्याच्यातिल जागरुकता वाढून त्याला शांति रहस्य उकलेल. त्याचे कुटूंब वाढते, त्याचा फुगा मोठा होतो. एखाद्याच्या हस्तक्षेपामुळे एखाद्या त्याच्या जिवणातिल उदिष्ट सापडण्यास मदत मिळते, त्याच्या आतिल आवाज ज्यामुळे तो गाऊ शकतो आणि दुस-यांना एकात्मतेच्या भावणेत एकत्र आणू शकतो. आणि अशा प्रकारे प्रेम एक होते, ती व्यक्ति त्याच्या जिवणातिल ख-या ध्येय पूर्तीकडे वळलेली असते प्रकाशातुन प्रकाशाकडे जे संपूर्ण भूमंडल आणि त्याहीपलीकडे जाईल. होय अणि ही फक्त सुरुवात आहे. ॐ



www.oriontransmissions.com

**यान्निक आरोग्य वार्तापत्रात "चांगली माहिती" वाटून घेतली त्याबद्दल धन्यवाद!**

**होमा थेरपि वरिल काही वेब साईट्स:**

www.terapiahoma.com www.homa1.com www.homatherapy.info
www.agnihotra.org www.homatherapie.de www.homatherapy.de
www.tapovan.net www.homatherapyindia.com www.homatherapy.org
www.terapiahoma.com.pl www.homabrasil.br30.com

यान्निक आरोग्य वार्तापत्र बघण्यासाठी किंवा प्रिंट करण्यासाठी येथे क्लिक कराः